**नियमित दिवाणी दावा क्र. ४९/२०२०**
**नि. क्र. ३० लगत**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. ०१ वादी बँकेचा प्रतिनिधी मुकूंद श्रीपाद खांडेकर यांचा उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञा श्रीमती पी. सी. चव्हाण यांच्याकडून</u> –**

**०९**. हे म्हणणे खरे आहे की, या प्रकरणातील कर्जासंबंधीचे जे मुख्य दस्त आहेत ते सर्व मुख्य दस्ताऐवज परीक्षक, पुणे यांच्या कार्यालयात आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ते दस्त गुन्हा नोंद क्रमांक ६७/२०१८ म्हणजेच नियमित फौजदारी खटला क्र. १६/२०१९ या प्रकरणात मुख्य दस्ताऐवज परीक्षक, पुणे यांच्याकडे पाठविले आहेत.

**१०**. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या बँकेचे जे शाखाधिकारी आहेत त्यांना त्या–त्या शाखेसंबंधी अधिकार असतात.

**११**. देय्य असलेले व्याज हे संबंधीत कर्जदाराच्या कर्जखाती लिहिले जाते, हे खरे आहे, साक्षीदार सांगतो की, परंतु प्रत्येकवेळी तसे होत नाही. देय्य व्याज कर्जखात्यात लिहिणे बंधनकारक आहे, या तुमच्या सूचनेबाबत माझे सांगणे की, जर कर्ज खाते नियमित असेल तर ते बंधणकारक आहे. हे म्हणणे खरे नाही की, देय्य व्याजाची रक्कम कर्ज खात्यात नमूद न केल्यामुळे प्रतिवादी ती रक्कम देणे लागत नाही.

**१२**. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रातील परीच्छेद क्रमांक ०७ मध्ये अनुक्रमांक ०१ ते ०७ नुसार ज्या दस्तांचा उल्लेख केलेला आहे, ते दस्त बँकेकडून कर्जदाराला दिले जातात. हे म्हणणे खरे आहे की, त्यापैकी निशाणी ३२ कडील दस्त म्हणजे कर्ज मागणी अर्ज हा इंग्रजीमध्ये आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यापैकी निशाणी ३३, ३४ व ३५ कडील दस्त म्हणजे वचन चिठ्ठी, 'एल४३५' असे नमूद असलेले पे बिअरर लेटर व 'एल४४०' असे नमूद असलेले इनस्टॉलमेंट लेटर हे तिन्ही दस्त हिंदी भाषेतील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी ३६ कडील दस्त म्हणजे ड्राफ्ट डिक्लेरेशन चा दस्त इंग्रजी व हिंदी भाषेत आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी ३७ व ३८ कडील दस्त म्हणजे करारपत्रक व कर्ज मंजूरी पत्र हे दोन्ही दस्त इंग्रजी भाषेतील आहेत.

**१३**. हे म्हणणे खरे आहे की, वर नमूद कर्ज मागणी अर्ज, वचन चिठ्ठी, पे बिअरर लेटर, इनस्टॉलमेंट लेटर, ड्राफ्ट डिक्लेरेशनचा दस्त, करारपत्रक व कर्ज मंजूरी पत्र यांतील मजकूर आमच्या बँकेतील कर्मचारी लिहितात व त्यावर कर्जदारांच्या सहया घेतल्या जातात. साक्षीदार पुन्हा सांगतो की, कर्ज मागणी अर्ज यातील मजकूर कर्जदार भरतात, इतर दस्तांतील मजकूर बँक कर्मचारी भरतात. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी ३२ कडील कर्ज मागणी अर्जावर असलेली कर्जदाराची स्वाक्षरी व त्या दस्तातील लिखीत स्वरुपातील इतर मजकूर हे वेगवेगळया हस्ताक्षरात आहेत. हे म्हणणे खरे नाही की, ते दोन्ही हस्ताक्षर वेगवेगळे नाहीत असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, कर्ज मागणी करणारा इसम अशिक्षीत असल्यास त्याचा निशाणी अंगठा दस्तांवर घेतला जातो.

**१४**. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीस इंग्रजी व हिंदी भाषा अवगत आहेत अगर कसे याबाबत खात्री केल्याचा उल्लेख निशाणी ३२ ते ३९ कडील दस्तांपैकी कोणत्याही दस्तावर नाही. हे म्हणणे खरे आहे की, तसेच इंग्रजी किंवा हिंदी अथवा इंग्रजी व हिंदी भाषेत जो दस्त आहे तो प्रतिवादीस अवगत असलेल्या भाषेत भाषांतरीत करुन प्रतिवादीस समजावून सांगितले होते, असाही उल्लेख त्यापैकी कोणत्याही दस्तावर नाही.

**१५**. हे म्हणणे खरे आहे की, सोने तारण कर्ज मिळण्यासाठी अर्ज आल्यावर त्या अर्जाबाबत खातरजमा करुन कर्ज मंजूर केले जाते. हे म्हणणे खरे आहे की, त्याचबरोबर, तारण ठेवावयाच्या सोन्याबाबत सुध्दा शहानिशा केली जाते व मगच कर्ज मंजूर केले जाते. हे म्हणणे खरे नाही की, सोने तारण कर्ज मागणीचा अर्ज आल्यापासून कर्ज मंजूरीस काही दिवस लागतात, साक्षीदार सांगतो की, लगेच मंजूर केले जाते.

**१६**. हे म्हणणे खरे नाही की, कर्ज परत फेडीची मुदत किती होती हे मी वादपत्रात किंवा माझ्या प्रतिज्ञापत्रातही नमूद केलेले नाही. प्रतिवादीने त्या कर्जापोटी किती रक्कमेची परतफेड केली हे वादपत्रात किंवा माझ्या प्रतिज्ञापत्रातही नमूद नाही, या तुमच्या सूचनेबाबत माझे सांगणे की, मला त्याबाबत आठवत नाही. कर्ज रक्कमेच्या वसूलीसाठी दावा केला

असताना, कर्जदाराने किती रक्कम कर्ज घेतल्यापासून कर्जाची परतफेड म्हणून भरली आहे हे नमूद करणे मला आवश्यक वाटत नाही.

**१७.** हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या प्रतिज्ञापत्रात आमच्या कडवई शाखेतील बाबींविषयी जे काही नमूद केले आहे, ती सर्व माझी ऐकीव माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, या प्रकरणी कर्ज मागणी अर्ज केला त्यावेळी मी आमच्या कडवई शाखेत कार्यरत नव्हतो. त्यावेळी मी सावर्डे येथील शाखेत कार्यरत होतो.

**१८.** हे म्हणणे खरे आहे की, एखादया व्यक्तीने आमच्या बँकेकडून सोनेतारण कर्ज घेतले असेल व त्या कर्ज रक्कमेचा संपूर्ण भरणा केला नसेल तर त्या कालावधीत त्या व्यक्तीस नव्याने सोनेतारण कर्ज आमच्या बँकेकडून दिले जात नाही. साक्षीदार सांगतो की, पहिल्या सोनेतारण कर्जाचे खाते अवर्गीकृत झाले असेल तरच नवीन कर्ज दिले जात नाही. सोनेतारण कर्ज घेतले असेल व त्याची परतफेड एका वर्षात केली नाही तर संबंधीताचे खाते अवर्गीकृत होते, या तुमच्या सूचनेबाबत माझे सांगणे की, सर्वसाधारणपणे ते खरे आहे परंतू, आमच्या बँकेकडून कर्जदारांना एक युनिक क्रमांक दिला जातो, त्यानुसार, त्या ग्राहकाचे एका पेक्षा जास्त कर्ज खाते असतील व त्यातील एक जरी अवर्गीकृत झाले तर इतर कर्ज खाते त्यांच्याबाबतचा एक वर्षांचा कालावधी संपण्यापूर्वी सुध्दा अवर्गीकृत केले जातात. हे म्हणणे खरे आहे की, एखादया कर्जदाराचे खाते अवर्गीकृत झाले असेल तर त्याबाबतची रक्कम अदा केल्याशिवाय त्या कर्जदाराला नवीन कर्ज आमच्या बँकेकडून दिले जात नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीस या दाव्यात नमूद कर्ज मागणी प्रकरणानंतरही आमच्या बँकेने कर्ज दिले आहे.

**१९.** प्रेमसागर गुप्ता यांनी गुन्हा नोंद क्रमांक ६७/२०१८ मधील फिर्याद दिनांक २१/०८/२०१८ रोजी दाखल केली होती, या तुमच्या सूचनेबाबत माझे सांगणे की, मला त्याबाबत तारीख आठवत नाही.

**२०.** हे म्हणणे खरे आहे की, तारण ठेवावयाचे सोने हे कर्जदारासमक्ष सिल केले

जाते. हे म्हणणे खरे आहे की, सोनेतारण कर्जाचे नुतनीकरण करतेवेळी पुन्हा ते सोने काढून त्या कर्जदारासमक्ष सिल केले जाते. हे म्हणणे खरे आहे की, सिलबंद केलेले सोने कर्जदाराच्या अनुपस्थीतीत उघडण्याचे अधिकार बँकेला नाहीत, साक्षीदार सांगतो की, तसे सर्वसाधरण परीस्थीतीत असते. 'सर्वसाधारण परीस्थीती' म्हणजे जेव्हा कर्ज खाते नियमित असते व त्याबाबत कोणतीही ठकवनूक उघडकीस आलेली नसते, अशी परीस्थीती. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत आहे त्याप्रमाणे सर्वसाधारण परीस्थीती नसेल तर बँकेला कर्जदाराच्या अपरोक्ष तारण ठेवलेल्या सोन्याचे सिल काढून ते सोने पाहता येईल असे कोणत्याही नियमांत किंवा नियमावलीत नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, तारण म्हणून ठेवलेल्या सोन्यावर संबंधीत शाखाधिकाऱ्यांचेच नियंत्रण असते. हे म्हणणे खरे आहे की, तारण ठेवलेले सोने ठेवण्याची शाखेत एकच जागा असते, साक्षीदार सांगतो की, ते तिजोरीत ठेवलेले असते.

२१. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या कडवई शाखेत तारण ठेवलेले सोने ठेवण्यासाठी जी तिजोरी आहे ती मी प्रत्यक्ष पाहिलेली नाही. मी २०११ साली त्या शाखेत शाखाधिकारी म्हणून काम करीत होतो त्यावेळी तसेच त्यानंतर कधीही त्या शाखेला भेट दिल्यावर मी ती तिजोरी पाहिली आहे. मी नंतर त्या शाखेला कधी भेट दिली होती त्याची तारीख किंवा वर्ष मला सांगता येत नाही. मागील ०८ ते ०९ वर्षांत मी ती तिजोरी पाहिलेली नाही, या तुमच्या सूचनेबाबत माझे सांगणे की, मागील ०८ ते ०९ वर्षांच्या कालावधीत मी एक–दोन वेळेस त्या शाखेत भेट दिली असावी, त्यावेळी तिजोरी पाहिली असेल. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळी मी ज्या शाखेत अथवा कार्यालयात कर्तव्यावर आहे त्या शाखेतून अथवा कार्यालयातून इतर ठिकाणी भेट देण्यासाठी जावे लागते तेव्हा जाण्या–येण्या बाबतच्या तशा नोंदी आम्ही नोंदवहीत ठेवतो. तशा नोंदी आजही आमच्या कार्यालयाकडे उपलब्ध होवू शकतात. आता मागील काही तारखांपासून मी या न्यायालयात या व इतर अशाच स्वरुपाच्या प्रकरणांबाबत साक्ष देण्यासाठी येत आहे. या कालावधीत मी त्या नोंदीबाबत पडताळणी केलेली नाही. मी दावे दाखल करतेवेळी सुध्दा नोंदीबाबतचे ते

अभिलेख पाहिले नाहीत.

२२. हे म्हणणे खरे आहे की, सोने तारण कर्जाची परतफेड झाल्यावर तारण ठेवलेले सोने कर्जदाराला परत देतेवेळी आमच्या शाखेच्या अधिकृत सराफास बोलावले जात नाही. हे म्हणणे खरे आहे की, सोने तारण ठेवतेवेळी जे सील लावलेले असते, ते सील कर्जदारासमक्ष उघडले जाते व त्यातील सोने कर्जदारास परत केले जाते. हे म्हणणे खरे नाही की, बॅंकेच्या नियमाप्रमाणे कर्जदारास ते सोने परत देतेवेळी सुध्दा सराफाची उपस्थीती गरजेची आहे.

२३. प्रस्तुत प्रतिवादीने या कर्ज प्रकरणाच्या संबंधी काय–काय व किती सोने तारण ठेवले होते हे मला आता सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणातील कर्ज प्रकरणाच्या संबंधाने आमच्या बॅंकेने प्रतिवादीस किती कर्ज दिले होते हे मला आता सांगता येत नाही. या प्रतिवादीकडून आकारावयाचा व्याज दर किती होता हे मला सांगता येत नाही. या प्रतिवादीचा कर्ज खाते क्रमांक किती होता हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादपत्रात नमूद तारखा व रकमा मला सांगता येत नाहीत.

**<u>भारतीय साक्षीपुरावा अधिनियमचे कलम १६५ अन्वये न्यायालयाकडून प्रश्न</u>** –

**प्रश्न** – याबाबत तुम्हाला का सांगता येणार नाही ?

**उत्तर** – मी ५४ प्रकरणे दाखल केली आहेत. प्रत्येक प्रकरणातील बाबींविषयी पाहून सांगू शकतो, न पाहता मला सांगता येत नाही.

**<u>प्रतिवादीच्या विधीज्ञा यांच्याकडून उलटतपास पुढे सुरु</u> –**

२४. हे म्हणणे खरे आहे की, तारण ठेवण्यासाठी दिलेले सोने हे बॅंकेत कोणाकडे व कशारीतीने ठेवले जाते याबाबत मी वादपत्रात तसेच माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, तारण ठेवण्यासाठी आणलेल्या दागिन्यांची तपासणी तारण ठेवतेवेळी कोणी व कोणत्या दिवशी केली याबाबतचा प्रत्येक कर्जदारासंबंधीचा स्वतंत्र

अहवाल असतो. हे म्हणणे खरे नाही की, मी त्याबाबतचा कोणताही अहवाल या प्रकरणी दाखल केलेला नाही, साक्षीदार सांगतो की, त्याबाबत मूल्यांकनाचे प्रमाणपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी ३९ कडील मला आता दाखविण्यात आलेल्या मूल्यांकनाच्या प्रमाणपत्रावर आमच्या कोणत्याही बँक अधिकारी किंवा कर्मचाऱ्याची सही नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यावर आमच्या बँकेचा कोणताही शिक्का नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे निशाणी ३९ कडील प्रमाणपत्र हे या दाव्यात नमूद तारण सोन्यापूरतेच मर्यादीत नाही.

**२५**. एका कर्जदाराने एकादिवशी सोने तोरण कर्ज घेतले व त्यानंतर लगेचच दुसऱ्या दिवशी त्याने अथवा इतराने सोने तारण कर्ज घेतले असेल तर त्याबाबत व्याजदर एकच असेल, असे नाही. हे म्हणणे खरे आहे की, बँकेकडून एकाच दिवशी अनेक व्यक्तींना सोने तारण कर्ज दिले असेल तर त्या सर्वांच्याबाबत एकच व्याजदर असेल. हे म्हणणे खरे आहे की, मी या प्रकरणासारखे एकूण ५५ प्रकरणे या न्यायालयात दाखल केले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ही सर्व प्रकरणे पुराव्यासाठी प्रलंबीत आहेत. ही प्रकरणे पाहता, एकाच दिवशी बँकेने वेगवेगळया कर्जदारांना दिलेल्या सोने तारण कर्जाबाबत वेगवेगळा व्याजदर बँकेकडून लावण्यात आला, या तुमच्या सूचनेबाबत माझे सांगणे की, असे तर होणार नाही, झालेही नसेल परंतू तसे जर असेल तर ते चुकीने झाले असावे.

**२६**. हे म्हणणे खरे आहे की, तारण ठेवलेले सोने बँकेच्या सेफ लॉकरमध्ये ठेवताना व सेफलॉकरमधून काढतेवेळी सुध्दा त्याबाबत बँकेतील नोंदवहीत नोंद केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, त्याबाबतचे दस्त मी या दाव्याकामी दाखल केले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, दावा दाखल करतेवेळी त्या नोंदी मी पडताळल्या याबाबत सुध्दा वादपत्रात काही नमूद नाही.

**२७**. हे म्हणणे खरे आहे की, तारण ठेवलेले सोने बँकेच्या सेफ लॉकरमध्ये ठेवताना व सेफलॉकरमधून काढतेवेळीच्या बँकेतील नोंदी मी स्वतः पडताळल्या नाहीत. हे म्हणणे खरे

आहे की, प्रतिवादीने तारण ठेवलेल्या वस्तू सोने धातूच्या असल्यानेच त्यावेळी त्यांना कर्ज देण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, वेगवेगळया कर्जदारांनी तारण म्हणून ठेवलेल्या वस्तूंची तपासणी नेमक्या कोण कोणत्या दिवशी झाली हे मला व्यक्तीशः माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, तारण ठेवलेले सोने बँकेच्या सेफ लॉकरमधून कधी काढण्यात आले याबाबत मला व्यक्तीशः माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, तपासणीसाठी सोने काढले जाते त्यावेळी सुध्दा त्याबाबत बँकेच्या नोंदवहीत नोंद केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, या प्रकरणात तशा कोणत्याही नोंदवहीचा मी उल्लेख केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या नोंदवहीच्या प्रती किंवा ती नोंदवही मी कागदोपत्री पुरावा म्हणून या प्रकरणी दाखल केला नाही. सेफ लॉकरमधून तपासणीकरीता बाहेर काढतेवेळी त्या तारण वस्तू कोणत्या अवस्थेत होत्या याबाबत मला व्यक्तीशः माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, कोणते दागिने कोणी तपासले याबाबत वादपत्रात तसेच माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, दागिने तपासल्यावर ताबडतोब पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांच्या ताब्यात देईपर्यंत त्या वस्तू कोणत्या अवस्थेत, कोणाच्या ताब्यात होत्या याबाबत मी काही पुरावा याकामी सादर केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, तारण म्हणून ठेवलेले दागिने सोने या धातूचेच होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यात नंतर बदल झाला.

२८. हे म्हणणे खरे आहे की, संबंधीत कालावधीत आमच्या बँकेच्या कडवई शाखेचे अधिकृत सराफ दिलीप रामचंद्र पंडीत हे होते. हे म्हणणे खरे आहे की, नमूदच्या वस्तू सोने धातूच्या असल्याबाबत बँकेचे अधिकृत सराफ यांच्याकडून खात्री करण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्याबाबत बँकेचे कर्मचारी यांनी सुध्दा व्यक्तीशः खात्री केली होती. हे म्हणणे खरे आहे की, तशी खात्री करुनच प्रतिवादीकडून त्या वस्तू बँकेने तारण म्हणून स्वीकारल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतरच प्रतिवादीला बँकेने सोने तारण कर्ज दिले. हे म्हणणे खरे आहे की, त्या वस्तूंची शुध्दता पाहून व किंमत ठरवूनच कर्ज देण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी तारण म्हणून जे सोने ठेवले होते ते

'सोने' नसल्याबाबत बँकेने घेतलेला पवित्रा अयोग्य आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या वस्तू सोने धातू नसल्याच्या आम्ही खोटेच सांगत आहोत. प्रतिवादीने तारण ठेवलेले दागिने विक्री करुन बँकेने कर्जाची रक्कम कपात करावी व उर्वरीत रक्कम प्रतिवादीस द्यावी, या तुमच्या सूचनेबाबत माझे सांगणे की, ते खोटे दागिने आहेत त्यामुळे ही बाब मान्य नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादपत्रात व पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात नमूद नियमित फौजदारी खटला क्रमांक १६/२०१९ मध्ये जो मुद्देमाल आहे त्या मुद्देमाल वस्तू प्रतिवादीने बँकेकडे तारण ठेवलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, त्या मुद्देमाल वस्तूंशी प्रतिवादीचा काही संबंध नाही.

**२९.** हे म्हणणे खरे नाही की, बँकेतील कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई होवू शकते म्हणून आमच्या बँकेच्या कर्मचाऱ्याने ती खोटीच फौजदारी केस दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळेच मी सुध्दा खोटाच दावा दाखल केला आहे.

**३०.** प्रतिवादीने तारण ठेवलेल्या वस्तू तपासणीसाठी सेफ लॉकरमधून काढण्यात आल्या त्यावेळी मी स्वतः तेथे हजर नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, कर्जदाराने तारण म्हणून ठेवलेल्या वस्तू सेफ लॉकरमधून बाहेर काढतेवेळी तेथे कर्जदार हजर असणे आवश्यक आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी प्रतिवादी तेथे हजर होता असे दर्शविणारा काही कागदोपत्री पुरावा याकामी नाही.

**३१.** हे म्हणणे खरे नाही की, नमूद रक्कम देण्यास प्रतिवादी जबाबदार असल्याचे मी खोटेच सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, कर्ज मागणी करीता प्रतिवादीने कागदपत्र लिहून बँकेकडे दिली असे मी खोटेच सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही नमूद केलेले व्याजाचे दर चुकीचे व खोटेच आहेत.

**प्रश्न** – प्रतिवादीने कर्ज रकमेपैकी कोणतीही रक्कम बँकेस परत केली नाही हे तुम्ही खोटेच सांगत आहात, हे खरे का?

**उत्तर** – मी वेगवेगळी अशाच प्रकारची ५५ प्रकरणे या न्यायालयात दाखल केलेली आहेत. काही प्रकरणातील प्रतिवादीने कर्जाची थोडीफार रक्कम बँकेला दिलेली आहे, काहींनी

कोणतीही रक्कम दिलेली नाही. कोणत्या प्रकरणांत काही रक्कम दिली आहे व कोणत्या प्रकरणांत कोणतीही रक्कम दिलेली नाही, हे मला आता आठवत नाही.

**३२**. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही प्रतिवादीला पाठविलेली नोटीस खोटी व खोडसाळ आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी कोणतीही रक्कम बँकेस देणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही खोटा व खोडसाळ दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

TARE BALIRAM DATTATRAYA

Digitally signed by TARE BALIRAM DATTATRAYA
Date: 2024.09.27 18:44:52 +0530

**(ब. द. तारे)**

दिनांक २७.०९.२०२४

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, देवरुख

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 27/09/2024 |
| Evidence signed by PO. on | :- | 27/09/2024 |
| Evidence uploaded on | :- | 27/09/2024 |